नागपूर वनविभागातील पंचमुखी हनुमान मंदीर, बाबुलखेडा निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास कामांच्या अ.क्र.१ ते १२ अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वन विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१४४/वने-९
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २८ जुलै, २०२६

वाचा :-

१. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष २४/लेखा/प्र.क्र.०९/१३६/२०२६-२७, दिनांक ०८.०६.२०२६
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष २४/लेखा/प्र.क्र.०९/१७५/२०२६-२७, दिनांक २३.०६.२०२६
३. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम (भाग-२), दि. २०.०९.२०१९
४. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१०/इमा-२, दि.२५.०९.२०१९

प्रस्तावना:-

नागपूर वनविभागातील पंचमुखी हनुमान मंदीर, बाबुलखेडा निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास कामांच्या रु.१४,६१,१८,५००/- इतक्या रकमेच्या अ.क्र.१ ते १२ अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत वाचा क्र.१ व २ येथील पत्रान्वये विनंती केली आहे.

वित्त विभागाच्या वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा करण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या वाचा येथील क्र.१ चा शासन निर्णय दिनांक २०.०९.२०१९ मधील भाग एक उपविभाग-५ परि.क्र.१३४(१), १३४(२) आणि १३४(३) नुसार तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे वाचा क्र.२ येथील दिनांक २५.०९.२०१९ च्या परिपत्रकान्वये स्थापत्य व विद्युत कामाशी संबंधित रु.१५ कोटी किंमती पर्यंतच्या कामांना संबधित मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांनी तांत्रिक सहमती दिल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे अधिकार संबंधीत उपभोक्ता विभागास देण्यात आलेले आहेत.

सदर मुळ अंदाजपत्रकांना वाचा येथील क्र.४ च्या शासन परिपत्रकातील तरतूदीनुसार मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी तांत्रिक सहमती (Technical Approval) दिलेली आहे.

त्यानुसार नागपूर वनविभागातील पंचमुखी हनुमान मंदीर, बाबुलखेडा निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास कामांच्या रु.१४,६१,१८,५००/- इतक्या रकमेच्या अ.क्र.१ ते १२ अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.१ व २ च्या पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव व वित्त विभागाचा संदर्भ क्र.३ चा शासन निर्णय व सार्वजनिक बांधकाम विभागाचे संदर्भ क्र.४ चे परिपत्रक आणि विभागास प्राप्त अधिकार विचारात घेता, नागपूर वनविभागातील पंचमुखी हनुमान मंदीर, बाबुलखेडा निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास कामांच्या रु.१४,६१,१८,५००/- इतक्या रकमेच्या सोबत जोडलेल्या "प्रपत्र-अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे अ.क्र.१ ते १२ अंदाजपत्रकांना खालील अटीच्या अधीन राहून (वित्तीय मान्यता वगळून) प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी उपरोक्त तक्त्यातील नमूद अंदाजपत्रकातील कामांना वित्त विभागाचा शासन निर्णय दिनांक २०.०९.२०१९ व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक २५.०९.२०१९ मधील परिपत्रकातील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांची तांत्रिक मान्यता असल्याची खातरजमा करावी. तसेच उपरोक्त नमूद अंदाजपत्रकातील कामे हे निसर्ग पर्यटन या योजनेत समाविष्ठ असल्याची खातरजमा करावी.
२. अंदाजपत्रक व नकाशे उपभोक्ता विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडून साक्षांकित करुन घेण्यात यावे.
३. कामे सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.
४. प्रस्तुत काम पुरातत्व विभागाच्या अखत्यारित येत असल्यास संबंधीत विभागाची तसेच महानगरपालिका व तत्सम प्राधिकरणे यांची पूर्व परवानगी घ्यावी.
५. तांत्रिक मंजूरी देताना राज्य दरसूचीबाहय बाबींच्या दराकरीता शासन परिपत्रक क्रमांक-२०१७/प्र.क्र.११/नियोजन-३, दिनांक ११.०४.२०१७ नुसार कार्यवाही करण्यात यावी.
६. प्रस्तावातील खरेदीशी संबंधीत बाबींकरीता ई-निविदा प्रणालीचा अवलंब करुन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दि.२४.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या सूचना विचारात घ्याव्यात.
७. प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१, दिनांक १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.
८. स्थापत्य कामाच्या कालावधीतच विद्युतीकरणाबाबत तसेच इतर अनुषंगिक कामांचे योग्य नियोजन करुन सदर कामे पूर्ण करावीत.
९. सदर कामाच्या बांधकामाचा खर्च योजनेंतर्गत मंजूर उपलब्ध असलेल्या नियतव्ययातून करण्यात यावा.
१०. ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतुदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक दरपत्रके मंजूर करूनच काम हाती घ्यावे.
११. सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८० मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशाची अवहेलना होणार नाही, याची सुध्दा दक्षता घ्यावी.

१२. वित्त विभागाच्या दिनांक ९.४.२०२६ रोजीच्या परिपत्रकातील अटी व वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१३. शासन निर्णय क्रमांक एमएससी-२०११/प्र.क्र.१७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

१४. कामांची अंमलबजावणी करताना कामांचे एकत्रीकरण करुन नियमानुसार ई-निविदा प्रणाली अवलंबण्याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम(भाग-२), दिनांक २०.९.२०१९ अन्वये वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा या शासन निर्णयातील भाग एक उपविभाग- ५ परि.क्र.१३४ (१), १३४ (२) आणि १३४ (३) नुसार तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१०/ इमा-२, दिनांक २५.०९.२०१९ अन्वये स्थापत्य व विद्युत कामाशी संबंधित रु.१५ कोटी किंमती पर्यंतच्या कामांना संबधित मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांनी तांत्रिक सहमती दिल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे उपभोक्ता विभागास प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२८११५६२९८८४० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SAHEBRAO NARAYAN GHIGE

Digitally signed by SAHEBRAO NARAYAN GHIGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=50720D321EE35020D5890011DABACB4544786E9FD267F17DF767B4DAD3D079B2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FB0550286A6A429379E74F30B4CA229BEFB58E13393AEBF97688ECB194F0EE71, cn=SAHEBRAO NARAYAN GHIGE
Date: 2026.07.28 11:58:21 +05'30'

**( साहेबराव घिगे )**
**अवर सचिव (वने), महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर
४. वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर
५. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
६. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
७. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई.
८. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई.
९. कार्यासन वने-२/ब-१ , वन विभाग/महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. कार्यासन वने-९, वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)

**शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१४४/फ-९, दिनांक २८ जुलै, २०२६ सोबतचे “प्रपत्र - अ”**

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | Tourism Development of Panchmukhi Hanuman Mandir At Banulkheda, Saoner, Nagpur For Parking Area (Meta Fencing Area) | १,०४,५०,१०९/- |
| २ | Tourism Development of Panchmukhi Hanuman Mandir At Banulkheda, Saoner, Nagpur For (Metafencing & Plumbing & Senitory Work of Toilet) | १,०४,०१,४९४/- |
| ३ | Meta Fencing of Site Boundary (Length-३९०.००RM) D (Part ४) | ७३,७६,९५८/- |
| ४ | Tourism Development of Panchmukhi Hanuman Mandir At Banulkheda, Saoner, Nagpur For Parking Area (C-Meta Fencing fo Site Boundry Length:११६०.००RM) | २,०९,४६,४४६/- |
| ५ | Tourism Development of Panchmukhi Hanuman Mandir At Banulkheda, Saoner, Nagpur For Parking Area (B-Meta Fencing fo Site Boundry Length:११६०.००RM) | २,०९,४६,४४६/- |
| ६ | Soil Stabilization work for trekking Trail, ATV Track & Bamboo Walking Trail ०.०० To १.००KM | १,०८,५६,७२१/- |
| ७ | Soil Stabilization work for trekking Trail, ATV Track & Bamboo Walking Trail १.०० To २.००KM | १,०८,५६,७२१/- |
| ८ | Soil Stabilization work for trekking Trail, ATV Track & Bamboo Walking Trail २.०० To ३.००KM | १,०८,५६,७२१/- |
| ९ | Soil Stabilization work for trekking Trail, ATV Track & Bamboo Walking Trail ३.०० To ४.०० KM | १,०८,५६,७२१/- |
| १० | Soil Stabilization work for trekking Trail, ATV Track & Bamboo Walking Trail ४.०० To ५.०० KM | १,०८,५६,७२१/- |
| ११ | Soil Stabilization work for trekking Trail, ATV Track & Bamboo Walking Trail ५.०० To ६.०० KM | १,०८,५६,७२१/- |
| १२ | Soil Stabilization work for trekking Trail, ATV Track & Bamboo Walking Trail ६.०० To ७.०० KM | १,०८,५६,७२१/- |
| | Total:- | **१४,६१,१८,५००/-** |

SAHEBRAO NARAYAN GHIGE

Digitally signed by SAHEBRAO NARAYAN GHIGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=50720D321EE35020D5890011DABACB4544786E9FD267F17DF767B4DAD3D079B2, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=FB0550286A6A429379E74F30B4CA229BEFB58E13393AEBF97688ECB194F0EE71, cn=SAHEBRAO NARAYAN GHIGE
Date: 2026.07.28 11:58:37 +05'30'

( साहेबराव घिगे )
अवर सचिव (वने), महाराष्ट्र शासन